|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

## आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

**Department of Lifelong Learning & Extension**

जा.क्र. कबचौउमवि/१९ /आ.अ.व वि.वि./ज्ये.ना.उ./२९/२०२६ ई.पत्र सौर, १४ आषाढ, १९४८ शक संवत

दि.०६/०७/२०२६

**प्रति,**

**१) मा.प्राचार्य/ संचालक / विभाग प्रमुख/समन्वयक**
**कबचौउमविशी संलग्नित सर्व महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्था व**
**विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा/विभाग यांना...**

**२) मा. अध्यक्ष/सचिव,**
**ज्येष्ठ नागरिक संघ,**
**जळगाव/धुळे/नंदुरबार परिसर**

**विषय :- ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध उपक्रम राबविणेसाठी प्रस्ताव सादर करणेबाबत..**

**महोदय/महोदया,**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभाग हा विद्यापीठ आणि समाज यातील दुवा म्हणून कार्य करीत आहे. कौशल्याधिष्ठित व रोजगाराभिमुख असे विविध प्रमाणपत्र व पदविका शिक्षणक्रम चालविले जातात. तसेच बहिस्थ पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम व काही ऑनलाईन प्रमाणपत्र शिक्षणक्रम विभाग चालविते या शिवाय ज्येष्ठ नागरिक आणि शेतकरी या समाजघटकांसाठी विविध स्वरुपाचे कार्यक्रम नोंदणीकृत संस्थाच्या माध्यमातून विभाग आयोजित करीत असते. ज्ञानविस्तार उपक्रमातंर्गत विद्यार्थी महिला विविध क्षेत्रात कार्यरत घटक यांच्यासाठी कार्यशाळा व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. यापत्राद्वारे ' ज्येष्ठ नागरिक उपक्रमा ' अतंर्गत ज्येष्ठ नागरिक संघ/नोंदणीकृत संस्था आणि महाविद्यालये यांच्याकडून कार्यक्रम आयोजित करण्याबाबतचे प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

केंद्र, राज्य शासन व विद्यापीठाच्या ध्येय धोरणानुसार आपणही पुढाकार घेऊन समाजातील ज्येष्ठ, वयोवृध्द व इतर गरजू घटकांसाठी विविध उपक्रम राबवू शकतात. जसे मानसिक व शारिरीक आरोग्य शिबीर, व्याख्यान व चर्चासत्र किंवा या बाबतीत आपल्या काही नवनवीन संकल्पना असतील त्यानुसार आपण कार्यक्रमाचे आयोजन करु शकतात. योग्य त्या प्रस्तावांसाठी विद्यापीठातर्फे नियमानुसार कार्यक्रम झाल्यानंतर बिल सादर केल्यानंतर अनुदान देण्यात येईल.

आजीवन अध्ययन व विस्तार विभागतर्फे विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व महाविद्यालयांना तसेच सामाजिक संस्थांना व अधिकृत ज्येष्ठ नागरीक संघाना आवाहन करण्यात येते की, ज्येष्ठ नागरिकांशी संबंधित उपक्रम आपल्या महाविद्यालय/संस्था/अधिकृत ज्येष्ठ नागरीक संघ यांना आयोजित करावयाचा असल्यास नियम, अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्यांनी तसा प्रस्ताव विभागाकडे पाठवावा.

प्रस्ताव कार्यक्रमाचे सविस्तर स्वरुप, उद्दिष्ट, कार्यक्रम कोणासाठी आयोजित करणार, कार्यक्रमास किती ज्येष्ठ नागरीक व व्यक्ती सहभागी होतील तसेच कार्यक्रम अर्धा किंवा एक दिवसाचा असेल काय याबाबत याची सविस्तर माहिती द्यावी. **एका शैक्षणिक वर्षात एका हेड खाली फक्त एकच प्रस्ताव सादर करता येईल. प्रस्ताव विभागाचा ई पत्ता directorllleb@nmu.ac.in वर पाठवावा. कृपया कोणीही हार्ड कॉपी पाठवू नये.**

..२..

अधिक माहितीसाठी आजीवन अध्ययन व विस्तार विभाग कबचौउमवि, जळगाव येथे ०२५७-२२५७४१५ व २२५७४१६ वर संपर्क साधावा, ही विनंती.

कळावे!

**आपला विश्वासू**



**(प्रा. डॉ. मनिष र. जोशी)**
**संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग**

**सोबत:- प्रस्ताव पाठविण्याच्या नमुना**

**प्रत:- १) मा. जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव:-** उपरोक्त परिपत्रकास विविध वर्तमानपत्रात बातमीच्या रुपात प्रसिध्दी द्यावी ही विनंती.

**२) पध्दती विश्लेषक, संगणकशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव :-** सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रकट करावे.

---

**Phone-0257-2257415/416**
**FAX-0257-2258403-406**
**वेबसाईट-nmu.ac.in**
**ई.मेल- directorllleb@nmu.ac.in**

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)



## आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

**Department of Lifelong Learning & Extension**

## ज्येष्ठ नागरिकांसाठी उपक्रम (२०२६-२७)

---

महाविद्यालय/संस्था/विभागाचे नाव :-

ज्येष्ठ नागरिकांसाठी उपक्रमाचे नाव/विषय :-

उपक्रमाचा वार, दिनांक :-

उपक्रमाची वेळ व ठिकाण :-

उपक्रमाचे स्वरुप (अर्धा दिवस/पूर्ण दिवस) व नियोजन :-

उपक्रमासाठी/व्याख्यान/मार्गदर्शनासाठी उपस्थित राहणाऱ्या वक्त्यांची नावे :-

उपक्रमासाठी उपस्थित राहणाऱ्यांची संख्या :- पुरुष:- महिला :-

उपक्रमासाठी अपेक्षित असलेल्या अनुदानाचे सविस्तर विवरण :-

१) तज्ञ साधन व्यक्ती मानधन :-

२) सहभागी प्रतिनिंधिंना चहा, नाश्ता व भोजन :-

३) बॅनर व प्रमाणपत्र (गरज भासल्यास), फोटो :-

४) सभागृह, विद्युत व्यवस्था, मंडप, खुर्ची, टेबल, लाऊड स्पिकर (फक्त मान्यता प्राप्त संस्थासाठी) :-

५) एकूण खर्च :-

**उपक्रम समन्वयक**
**नाव, संपर्क क्रमांक, ईमेल आयडी व सही**

**प्राचार्य/अध्यक्ष/विभागप्रमुख**
**सही व शिक्का**

**प्रस्ताव पाठविण्याचा पत्ता :-** मा.संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, पोस्ट बॉक्स नं.८० उमवि नगर कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव पिन-४२५००१

**संपर्क क्रमांक :-** ०२५७-२२५७४१५ व २२५७४१६ **ई.मेल- directorllleb@nmu.ac.in**

**सूचना :-** उपरोक्त प्रमाणे सर्व माहिती आपण आपल्या महाविद्यालय/संस्था/विभागाच्या लेटर हेड वर ई.मेल द्वारा पाठवावी तसेच जलद व सुलभ संपर्कासाठी संबंधित महाविद्यालय/ संस्था यानी नियुक्त केलेल्या समन्वयकांचा सक्रीय मोबईल नंबर व ई.मेल आयडी देणे अत्यंत आवश्यक आहे.